AvianMedia

# Aapla Vartahar

Wednesday, August 26th, 2009 (Mumbai)
Page No- 8

## खेळाडूंवर दडपण नको–भज्जी

**नवी दिल्ली :** दिल्ली जिल्हा क्रिकेट संघटना आणि वीरेंद्र सेहवाग यांच्यातील वादात भज्जीने प्रतिक्रिया व्यक्त केल्यानंतर राजकीय दबाव वाढत असल्याने 'खेळ हा खेळाडूंमुळे असतो राज्यकर्त्यांमुळे नव्हे' असे, भज्जीने ठणकावून सांगितले. आगामी श्रीलंका येथे होणाऱ्या त्रिकोणी क्रिकेट मालिकेतील कॅम्पॅक ट्रॉफी अनावरण समारंभात हरभजन बोलत होता.

एखाद्या खेळाची लोकप्रियता, प्रतिष्ठा ही खेळाडूंमुळेच वाढत असते. क्रिकेट असो किंवा अन्य कोणताही खेळ असो खेळाला खेळाडूच गतिमान बनवतात राज्यकर्ते नाहीत, असे हरभजन बोलला.

राजकारणाशी संबंधित काही लोक फक्त खेळाचे, स्पर्धेचे प्रशासक-संयोजक असतात. आगामी त्रिकोणी मालिका स्पर्धेत सेहवाग आणि झहीर खान खेळणार नसले तरी टीम इंडिया मजबूत असल्याचेही हरभजनने सांगितले.